epaper.सामना.com साठी येथे क्लिक करावे. epaper.saamana.com

ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे एकमेव मराठी दैनिक
सामना
ISO 9001:2000
संपादक : बाळ ठाकरे



Click Here For Hidden Gems After Recent Fall
Ads by Guruji

रविवार, दि. २२ नोव्हेंबर २००९



# एकत्रित साधना!

## पिढ्यान्‌पिढ्या आपल्याकडे एक गोष्ट सांगितली जाते. त्या गोष्टीत एक मनुष्य अगदी सहजतेने लाकडाची एक काठी तोडत असे, परंतु तोच मनुष्य अशा अनेक काठ्यांची मोळी मात्र तोडू शकत नसे. त्या गोष्टीतला संदेश होता तो एकत्रतेचा.

व्यावहारिक जगात जी शक्ती एकत्रतेची असते तीच किंबहुना त्याहून कित्येक पटीने अधिक शक्ती ही सामुदायिक आध्यात्मिक साधनेत असते. कुठलीही साधना सामुदायिकरीत्या केल्यामुळे नेमके काय घडते याचा शोध लेडबिटर या थिओसॉफीच्या प्रसिद्ध शास्त्रज्ञाने काही वैज्ञानिक प्रयोगांद्वारे घेतला आहे. किर्लिन फोटोतंत्राद्वारे, गायत्री मंत्राच्या पठणातून निर्माण होणाऱ्या ऊर्जेचा त्याने अभ्यास केला आणि निष्कर्ष मांडले की, एका व्यक्तीने गायत्री मंत्राचे पठण केले असता जेवढ्या ऊर्जेची अथवा ऊर्जा शलाकेची निर्मिती होते, त्यापेक्षा कित्येक अधिक पटीत ऊर्जेची निर्मिती, गायत्री मंत्राच्या सामुदायिक पठणातून होते. ही ऊर्जानिर्मिती त्या समूहातील व्यक्तिसंख्येप्रमाणे असत नाही, तर त्यापेक्षाही अधिक पटीत असते. कारण एकत्र साधनेमध्ये साधकांच्या संख्येच्या प्रमाणात शक्तीची बेरीज न होता शक्तीचा गुणाकार होतो. उदाहरणार्थ शंभर साधकांनी एकत्र येऊन अथर्वशीर्षाचे शंभर वेळा पठण केले तर १००+१००+१००... असे शंभर वेळा; या सूत्राऐवजी १००+१००+१०० असे शंभर वेळा म्हणजे (१००)$_{१००}$ या सूत्रानुसार महाप्रचंड प्रमाणात शक्तीची निर्मिती होते. एकत्रतेतून निर्माण होणाऱ्या शक्तीचे आणखी एक उदाहरण म्हणजे दुसऱ्या महायुद्धावेळी सैन्याच्या एका छोट्या तुकडीचे संचलन होत असता, सेंट पीटस्‌बर्गचा पूल कोसळला. एरवी त्या पुलावरून त्यापेक्षा जास्त लोक जात असताना छोट्या तुकडीच्या संचलनावेळी मात्र हा पूल कसा पडला याची चौकशी करण्यात आली. चौकशीअंती असे निष्पन्न झाले की, एकावेळी समूहाच्या झालेल्या एकसारख्या क्रियेमुळे सामुदायिक समगतिस्पंदन निर्माण होऊन सेंट पीटस्‌बर्गचा पूल कोसळला. (फिजिक्स फॉर एव्हरीवन-मोशन हीट: लॅण्डो)

हाच सामुदायिक समगतिस्पंदनाचा न्याय अध्यात्मातही लागू होतो. एकावेळी, एका स्थळी, एका हेतूने प्रेरित होऊन समुदायाने केलेली प्रार्थना किंवा आध्यात्मिक साधना, ही फलप्रद होण्याची शक्यता कित्येक पटींनी अधिक असते. लेडबिटरने गायत्री मंत्राच्या सामूहिक पठणावर केलेल्या वैज्ञानिक प्रयोगाचे निष्कर्ष हेच दर्शवतात की सामूहिक साधनेमध्ये शक्तीचा मोठ्या प्रमाणावर गुणाकार होतो. अर्थात विज्ञानाने सिद्ध केलेले हे ज्ञान आपल्या पूर्वजांना ज्ञात असल्यामुळेच त्यांनी एकत्र साधनेचा पुरस्कार केला. वेदांतील सर्व प्रार्थना या समष्टी, म्हणजेच सामुदायिक कल्याणातून व्यष्टी, म्हणजेच व्यक्ती कल्याणाची मागणी करणाऱ्या आहेत. आपल्या पूर्वजांनी रचलेल्या कोणत्याही मंत्रांमध्ये संकुचित ‘मी’चा विचार केलेला आढळत नाही तर समष्टीचा म्हणजे ‘आम्ही’चा विचार केला आहे. सह नाववतु। सह नौ भुनक्तु। सह वीर्यं करवावहै। (क.उ./२/३/९९). या वैदिक शांती मंत्राचा आशयसुद्धा ‘आम्ही एकत्र येऊ आणि एकत्र साधना करू’ अशा एकत्रतेच्या भावनेवरच आधारित आहे. समष्टीला मिळाले की आपोआप व्यक्तीला मिळते, हे त्रैराशिक त्यांना ज्ञात होते, जे आज आपण विसरलेलो आहोत. अतिप्राचीन काळी ज्ञानमार्गी ऋषि-मुनींनी अग्निस्वरूप यज्ञेश्वर नारायणासमक्ष केलेली सामुदायिक यज्ञ साधना किंवा गोकुळातील भक्तिमार्गी गोप गोपींनी श्रीकृष्णाला केंद्रस्थानी मानून केलेली रासक्रीडा, या दोन्ही वरकरणी भिन्न वाटणाऱ्या साधनांमधे, ‘एकत्र येऊन ईश्वरी तत्त्वाशी तादात्म्य साधणे’ या मूलभूत उद्दिष्टाची समानता होती. कालौघात संघटित साधनेमागील या तत्त्वाचा समाजाला विसर पडत गेला, समाज अधिकाधिक व्यक्तिकेंद्रित झाला आणि त्यामुळे आपला वैयक्तिक, सामाजिक आणि राष्ट्रीय ऱ्हास झाला. आज अशी परिस्थिती आहे की, हिंदूंव्यतिरिक्त इतर सर्व धर्मीय आपापल्या धर्मस्थळांवर नियोजित वेळी एकत्र येऊन प्रार्थना करतात, साधना करतात व शक्तीनिर्मिती करतात किंबहुना एकत्रित साधना हे त्यांचे बलस्थान आहे, परंतु जेथून एकत्रित साधनेचा मूळ ज्ञानस्रोत आला, त्या आपल्या संस्कृतीचे ‘वारस’ असलेलो आपण मात्र सामूहिक गणेशोत्सव किंवा सामूहिक सत्यनारायण आयोजून, आपण एकत्र असल्याचा भास निर्माण करण्यात मग्न आहोत. या कार्यक्रमात एकत्रित आध्यात्मिक साधनेची कर्तव्यभावना किती आणि मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे आकर्षण किती हा प्रत्येकाच्या आत्मशोधनाचा विषय आहे. यात्रा, मेळा, पालखी इत्यादीसाठी जरी आपण एकत्र जमलो तरी त्यात समष्टी कल्याणासाठी एकावेळी, एकजुटीने प्रयत्न केलेला अभावानेच आढळतो. याचा अर्थ असे कार्यक्रम आयोजित करू नयेत असा नव्हे, कारण काही ना काही निमित्ताने एकत्र येणे ही समाजाची गरजच आहे, परंतु एकत्र साधना करण्यामागील गुणाकाराने शक्तिनिर्मिती करून समष्टीकल्याण साधण्याचा मूळ हेतू जर समजावून घेतला आणि तद्‌नुरूप जर हे उपक्रम अमलात आणले तर त्यांचे सध्याचे व्यक्तिकेंद्रित स्वरूप बदलून त्यांना संपूर्ण समाजाच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी केलेले संघटित प्रयत्न असे व्यापक स्वरूप प्राप्त होईल.

एकत्रित साधनेची गुणवत्ता ही केवळ संख्याबळावर अवलंबून नसते, तर त्यात भाग घेणाऱ्यांच्या विश्वास आणि विश्वकल्याणाच्या उदात्त हेतूवर अधिक अवलंबून असते. पाऊस पडावा म्हणून सामूहिक प्रार्थनेला जाताना बरोबर छत्री घेण्याचा विचारही मनाला शिवला नाही तर त्याचा अर्थ आपला आपल्यावरच विश्वास नाही असा होतो. अशा अर्धवट श्रद्धेचा शक्तिनिर्मितीसाठी काही उपयोग नाही. संगतीकरण ही फार मोठी ताकद आहे. ‘कितीही कालांतर लागले तरी साधना फलद्रुप होईलच’ या विश्वासाबरोबरच ‘सर्वांच्या कल्याणातच माझं कल्याण लपलेलं आहे’, हे ज्याला समजले त्याला एकत्रतेचे मर्म कळले. सामुदायिक साधनेला मात्र संप्रदायाची सीमा नसावी. सांप्रदायिकतेच्या सीमा ओलांडून जेव्हा अशी आध्यात्मिक साधना अथवा विश्वकल्याणाची प्रार्थना केली जाते तेव्हा गुणाकाराने निर्माण झालेली शक्ती ही त्या समूहालाच वैयक्तिक जीवनात आध्यात्मिक पथवर अग्रेसर करीत असते.

- बापट गुरुजी